समता चॅरीटेबल ट्रस्टचे मुखपत्र.

# समता वार्ता

मासिक

विश्वास + सुरक्षितता = समता

| वर्ष दुसरे – अंक चौथा | फेब्रुवारी २०१५ | **संपादक–** ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे | पृष्ठे ४ | किंमत ५ रु.

## समता पतसंस्थेची अकरावी राहुरी शाखा उद्घाटनासाठी सुसज्ज

कोपरगांव : लहान–मोठे दुकानदार, टपरीधारक, हातगाडीवाले, बाजार करणारे व्यापारी या सारख्या छोट्या कर्जदारांना सुलभ अर्थसहाय्य करणाच्या उद्देशाने १९८६ साली केवळ १,११,९००/– रुपये भाग भांडवलावर सुरू झालेल्या समता पतसंस्थेच्या रोपट्याचे रूपांतर वटवृक्षात झाले असुन समताच्या शाखा सातत्याने विस्तारत आहे. समता पतसंस्थेची आकरावी शाखा दि. १६ फेब्रुवारीपासुन राहुरी येथे ग्राहकांच्या सेवेत दाखल होत आहे. राहुरी येथील नगर–मनमाड राष्ट्रीय महामार्गावरील १६०० चौ. फुटाच्या अद्ययावत कार्यालयाचे उद्‌घाटन विधान सभेतील विरोधी पक्षनेते मा.राधाकृष्ण विखे पाटील यांच्या शुभहस्ते होणार आहे. तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान राहुरीचे माजी आमदार चंद्रशेखर कदम भूषविणार असुन या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून मा. श्री.सुरेशराव वाबळे (अध्यक्ष अ.नगर जिल्हा स्थैर्यनिधी सहकारी संघ मर्या.) व मा. श्री. शिवाजीराव कपाळे चेअरमन,(साई आदर्श मल्टीस्टेस को.–ऑप क्रेडीट सोसायटी राहुरी ) मा. श्री. एस. टी. कांदळकर (सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था राहुरी) व मा. श्री. दिगंबर हौसारे (जि.उपनिबंधक अहमदनगर) यांची उपस्थित लाभणार आहे.

ग्राहकांच्या सेवेत नव्याने कार्यरत होत असलेल्या राहुरी शाखेच्या शाखाधिकारी पदाचा कार्यभार श्री.फारुख शब्बीर शेख यांचेवर सोपविण्यात आला आहे. श्री.नामदेव उंडे, श्री.विजय कानडे सौ.ज्योती कातोरे, श्री.संदीप कुलकर्णी व श्री निहाल शेख याची लिपीकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तर श्री.संतोष पवार शिपाईपदी




कार्यरत असुन समताच्या सेवकांची ही टीम राहुरी वासियांना आपल्या विनम्र व तत्पर सेवेचा लाभ देण्यास सज्ज आहे.

समताच्या वाटचालीस २९ वर्षे पूर्ण होत असुन वाढत्या कार्यकाळासमवेत समताच्या कार्यव्यापही चांगलाच वाढला आहे. अतिशय प्रतिकुल परिस्थितीत १९८६ साली कोपरगांवमध्ये सुरु झालेल्या समता पतसंस्थेच्या कोपरगाव गांधी चौक, पुणे, नाशिक, अहमदनगर, श्रीरामपूर, राहाता, शिर्डी, येवला, वैजापूर येथे शाखा असून समता परिवारात राहुरी शाखेचा समावेश होत आहे.

११ मे १९८६ यादिवशी अक्षयतृतीयेच्या मुहूर्तावर सुरु झालेल्या समता पतसंस्थेचे भागभांडवल १,११,९००/– रुपये इतके व ठेवी १,२९,५८८/– रुपये इतक्या होत्या. ३१ डिसेंबर २०१४ अखेर २५७ कोटी रुपये ठेवींचा टप्पा गाठला असुन १८० कोटी रुपये कर्जवाटप केलेले आहे. सुरुवातीपासूनच समताचा एन.पी.ए. शुन्य टक्के आहे.

गेल्या २९ वर्षाच्या आपल्या यशस्वी वाटचालीत समताने अनेकांना आर्थिक हात देवून भक्कमपणे उभे राहण्यास मदत केली आहे. तसेच समता अनेक कुटूंबाचा आधार बनली आहे. आपल्या या वाटचालीत अनेक आपत्ती, संघर्षाचा मुकाबला करीत प्रसंगी कटुता, नाराजी ओढवुन घेत, नव्या सोयी–सुविधा, तंत्रज्ञानाचा अवलंब करीत समता उज्ज्वल भविष्याच्या दिशेन वाटचाल करीत आहे.

समताचे संस्थापक श्री.काकासाहेब कोयटे यांचे पारदर्शी, कणखर सक्षम नेतृत्व, एकमताने निर्णय घेवून त्यांना साथ देणारे संचालक मंडळ कोणत्याही आपत्ती वा संकटात न डगमगता त्यावर मात करून संस्थापक संचालकांनी लोकांना दिलेला विश्वास व सुरक्षितता यामुळेच समताचा भविष्यकाळ उज्ज्वल आहे. समताच्या अखंड वाटचालीत संस्थेला लाभलेले कर्तव्यदक्ष अधिकारी, विनम्र, व तत्पर कर्मचारी, पतसंस्थेच्या गंगाजळीत सातत्याने भर घालणारे अल्पबचत प्रतिनिधी तसेच सभासद ठेवीदार, कर्जदार व सर्वसामान्य ग्राहकांचा समतावरील गाढ विश्वास हे समताच्या प्रगतीतील महत्त्वपूर्ण भागीदार असून त्यामुळेच समता प्रगतीचे नव–नवे टप्पे पार करीत आहे.

## समता इंटरनॅशनल स्कूलचा स्नेहसंमेलन सोहळा उत्साहात संपन्न

कोपरगांव : भावी पिढी घडत असताना गुणवत्ता, अनुभव आणि विचारांची शिदोरी त्यांना मिळाली तर ती पिढी कर्तृत्वसंपन्न, ज्ञान संपन्न बनेल आणि अशा विविध गुणांची शिदोरी देवून पैलू पाडून घडविलेल्या भावी पिढीच्या कर्तृत्वावर हा देश भक्कमपणे उभा राहील. अत्यंत कल्पकतेने आपले महत्त्वाकांक्षी निर्णय सक्षमपणे प्रत्यक्षात उतरविण्यासाठी सदैव प्रयत्नशील असलेले समता इंटरनॅशनल स्कूलचे संस्थापक अध्यक्ष श्री ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे यांनी कोपरगांव या तालुक्याच्या ठिकाणी मेट्रोपॉलीटन सिटीमध्ये नसेल असे सुसज्ज ज्ञानमंदीर कोकमठाणसारख्या निसर्गरम्य परिसरात उपलब्ध करुन दिलं आहे. येथील सर्व महत्वाकांक्षी पालकांच्या आशा–आकांक्षा, स्वप्न त्यामुळे निश्चितच पूर्ण होतील असे प्रतिपादन कोपरगांव पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक श्री साजन सोनवणे यांनी केले.

शनिवार दि. २४ जानेवारी २०१५ रोजी समता इंटरनॅशनल स्कूलच्या प्रांगणात संपन्न झालेल्या स्नेहसंमेलन सोहळ्यात ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. श्री साजन सोनवणे व सौ. आशाताई सोनवणे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व नटराजपूजनाने कार्यक्रमाचा श्रीगणेशा झाला यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री. काकासाहेब कोयटे, सेक्रेटरी श्री जितेंद्रभाई शहा, श्री गुलाबचंदजी अग्रवाल, श्री. अरविंद भाई पटेल, श्री निरव खालिया, श्री विजय नायडू, स्कूलच्या मॅनेजिंग ट्रस्टी सौ. स्वाती संदीप कोयटे, सौ. सिमरन खुबाणी, सौ.श्वेता अजमेरा. सौ.शोभा दरक, समता पतसंस्थेचे जनरल मॅनेजर श्री सचिन भट्टड, प्राचार्य श्री.गोकूळ महाजन व उपप्राचार्या सौ.लिसा बर्धन आदी मान्यवर त्यावेळी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्तविक सौ.स्वाती कोयटे यांनी केले तर प्रमुख पाहुण्यांच्या परिचय प्राचार्य

पान २ वर

## समता इंटरनॅशनल स्कूलमध्ये ६६ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात संपन्न

कोपरगांव : येथील समता इंटरनॅशनल स्कूलमध्ये ६६ वा प्रजासत्ताक दिन सोहळा मोठ्या उत्साहवर्धक वातावरणात संपन्न झाला. श्रीरामपूर येथील विख्यात आर्किटेक्ट श्री.चेतन भुतडा प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांचा परिचयानंतर श्री भुतडा यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजारोहणानंतर विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध संचालनाद्वारा प्रमुख पाहुण्यांना मानवंदना दिली.

पान ३ वर



ध्वजारोहण सोहळ्यानंतर प्रमुखपाहुणे श्री.चेतन भुतडा व मान्यवरांना मानवंदना देताना विद्यार्थी प्रतिनिधी

**समता इंटरनॅशनल स्कूल स्नेहसंमेलनाची क्षणचित्रे**





समता इंटरनॅशनल स्कूल येथे झालेल्या स्नेहसंमेलनाच्या वेळी प्रमुख पाहुणे उपस्थित पोलीस निरीक्षक श्री. साजनजी सोनवणे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्रक व स्मृतीचिन्ह देवून गौरवितांना सोबत व्यासपीठावर, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री कोयटे, श्री. जितेंद्रभाई शाह, श्री.गुलाबचंदजी अग्रवाल, सौ.आशा सोनवणे, श्री.अरविंदभाई पटेल, सौ.स्वाती संदीप कोयटे, प्राचार्य गोकुळ महाजन, श्री.निरव खालीया, श्री.विजय नायडू, सौ.सिमरन खुबाणी, सौ.श्वेता अजमेरा, सौ.शोभा दरक, श्री.सचिनजी भट्टड आदी.

## विश्वास + सुरक्षितता = समता

### संपादकीय

# मरावे परि नेत्ररूपे उरावे

मृत्यूनंतरही जग पहा असं नेत्रदानाबाबत म्हटलं जातं. देशात लाखोंच्या संख्येने अंध व्यक्ती आहेत. काही जन्मत: अंध आहेत तर काही विविध कारणांनी अंध झालेले आहेत. अंधांना सृष्टीसौंदर्य, विविध वस्तू, रंगी–बेरंगी फुले–फळे वेगवेगळे पक्षी, प्राणी, आपले नातलग, जीवलग पाहण्याची संधी डोळस व्यक्तींनी मरणोत्तर नेत्रदान केल्यास प्राप्त होऊ शकते. समाजातील प्रत्येकाने मरणोत्तर नेत्रदानाचा संकल्प केला तर समाजातील अंधांना दृष्टी मिळेल व त्यांना जीवनाचा आनंद उपभोगता येईल. मृत्यूनंतर नेत्रदान करता येते ही बाब ध्यानी घेऊन ज्याची इच्छा असेल त्याने मृत्यूपूर्वी नेत्रदानाचा संकल्प केला तर समाजातील कितीतरी अंधांना नवी दृष्टी मिळून जग पहाण्याची संधी मिळेल. मृत्यूनंतर मृत व्यक्तीचे डोळे काढले तर मृत व्यक्तीचा चेहरा विद्रुप होतो असा गैरसमज आहे. डॉक्टर फक्त नेत्रदान करणाऱ्या (आयडोनरच्या) डोळ्यातील दृष्टीपटल (एक पापुद्रा) काढतात व डोळा बंद करून टाकतात. डोळ्यातील बुब्बुळे काढीत नाहीत याची खात्री करा व मगच नेत्रदानाचा फॉर्म भरा. नेत्रदान हे सर्वश्रेष्ठ दान मरणोत्तर करता येते. मृतशरीराबरोबर डोळे नष्ट होतात. मात्र नेत्रदान केल्यास डोळ्याच्या रुपाने तुम्ही जिवंत राहतात. हे ध्यानी घेऊन प्रत्येकाने नेत्रदान करावे. समाज ऋणातून मुक्त होण्यासाठी स्वेच्छेने पुढे यावे व मरणोत्तर नेत्रदानाची नोंद करावी. नेत्रदानाबरोबरच इतर अवयव दान करा व गरजूंना जीवनदान द्या असा नारा दिला जातो. नेत्रदान व अवयव दान तसेच देहदानाचे महत्त्व सांगून त्यासंदर्भातील गैरसमज दूर केल्यास अनेक व्यक्ती नेत्रदान व देहदानासाठी पुढे येतील यात शंका नाही मृत्यूनंतर साधारणत: ४८ तास मानवी अवयव जिवंत राहू शकतात या ४८ तासात डोळे, मूत्रपिंड, यकृत, फुफ्फुसे, शरीरातून काढण्याचे सोपस्कार पार पाडले जातात. हे अवयव गरजू व्यक्तींना जीवनदायी ठरतात. आपल्या मृत्यूनंतरही आपले अवयव इतरांना जीवनदान देवू शकतात. याबाबत सेवाभावी संस्था व आरोग्य विभागातर्फे जनजागृती केली जाते. अवयवदान मोहीमेचे बाजारीकरण होऊ नये यासाठी १९९४ साली केंद्र सरकारने मानवी अवयव प्रत्यारोपण अधिनियम १९९४ लागू केला. राज्यातही अवयव प्रत्यारोपणाकरीता अधिकृत केंद्राची स्थापना करण्यात आलेली आहे. राज्यात एक अवयव प्रत्यापोरणासाठी ९५ केंद्रे, एकापेक्षा जास्त अवयव रोपणाकरीता १८ केंद्रे व नेत्रपटल प्रत्यारोपणाकरीता २६० केंद्रे आहेत.

## हार्दिक अभिष्टचिंतन
## वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा !

| सभासदाचे नाव | जन्मतारीख | सभासदाचे नाव | जन्मतारीख |
|---|---|---|---|
| सौ.कल्पनाबाई अनिलशेठ बंब | २ फेब्रुवारी | सौ.सुमनबाई कांतीलालजी जोशी | १२ फेब्रुवारी |
| श्री.सुभाषशेठ जयंतीलालजी संघवी | २ फेब्रुवारी | सौ.सपना निलेशशेठ बंब | १४ फेब्रुवारी |
| श्रीमती द्वारकाबाई विठ्ठलदास बजाज | २ फेब्रुवारी | श्री.बाळासाहेब संपतराव पवार | १७ फेब्रुवारी |
| सौ.सुशिला चंदूलाल बजाज | २ फेब्रुवारी | श्री.रमेशअप्पा गोपीनाथआप्पा साखरे | १७ फेब्रुवारी |
| श्री.भरतशेठ कांतीलालजी अग्रवाल | ३ फेब्रुवारी | सौ.बसंती शामसुंदर बजाज | १७ फेब्रुवारी |
| श्री.संदीप कांतीलाल सोनजे | ४ फेब्रुवारी | श्री.समाधान भाऊसाहेब सानप | १८ फेब्रुवारी |
| श्री.लक्ष्मण रामकृष्ण अय्यर | ४ फेब्रुवारी | श्री.श्रीनिवास श्रीराम डागा | १८ फेब्रुवारी |
| श्री.सुरेशशेठ बन्सीलाल जोशी | ५ फेब्रुवारी | श्री.संजय विठ्ठलसा क्षत्रिय | १९ फेब्रुवारी |
| श्री.नंदलाल शिवनारायण अट्टल | ६ फेब्रुवारी | सौ.वंदनाताई चंद्रकांत तक्ते | २२ फेब्रुवारी |
| श्री.दिलीप माधवराव आढाव | ६ फेब्रुवारी | श्री.किशोरशेठ जगन्नाथजी बजाज | २४ फेब्रुवारी |
| सौ.शीलाताई पद्माकांत कुदळे | ६ फेब्रुवारी | श्री.अनुप अरविंदजी पटेल | २४ फेब्रुवारी |
| श्री.विलासशेठ बाबूराव जंगम | १० फेब्रुवारी | सौ.मनीषाताई नितीनशेठ भुसारे | २७ फेब्रुवारी |
| श्री.भगवानराव सखाराम लोखंडे | १२ फेब्रुवारी | श्री.संजय रघुनाथ शिरोडे | २७ फेब्रुवारी |
| श्री.फुलचंदशेठ दिलसुख पांडे | १२ फेब्रुवारी | श्री.प्रशांत गुलाबशेठ अग्रवाल | २८ फेब्रुवारी |
| श्री.सुभाषशेठ हरलालजी जोशी | १३ फेब्रुवारी | श्री.किशोरराव मुरलीधर शिंदे | २८ फेब्रुवारी |

**शुभेच्छुक : समता परिवार, कोपरगांव**

# संस्कृत विषय का व कशासाठी?

राष्ट्राची ओळख ही त्या राष्ट्रातील प्रचलीत भाषेवरून होते उदा. फ्रान्स, फ्रेंच रशिया–रशियन, जर्मनी, जर्मन आदी. भारताची ओळख संस्कृत या प्रचलीत भाषेवरून होते. संस्कृत ही देवभाषा असून तिला वैदिक भाषाही म्हणतात. संस्कृत भाषेत वेद, नाट्यशास्त्र, साहित्य तत्त्वज्ञान एवढेच नव्हे तर विज्ञान (सायन्स) रसायनशास्त्र (केमिस्ट्री) प्राणीशास्त्र (झुऑलॉजी) स्थापत्यशास्त्र इत्यादी अनेकविध विषयांवरील गंभीर, अभ्यासात्मक व चिंतनात्मक ग्रंथ लिहिले गेले. त्याचप्रमाणे संख्याशास्त्र (स्टॅटीस्टिक) शल्यचिकित्साशास्त्र (सर्जरी) राज्यशास्त्र (पॉलीटीकल सायन्स) नगररचनाशास्त्र (टाऊन प्लॅनिंग) इत्यादी आधुनिक काळातही उपयुक्त असलेले ग्रंथ देखील पुरातनकाळी लिहिले गेले.

संस्कृत भाषा संगणकासाठी अत्युच्च असल्याचे त्या क्षेत्रातील तज्ज्ञ मंडळी सांगतात. अतिशय कमीत कमी शब्दात जास्तीत जास्त आशय व्यक्त करण्याची क्षमता संस्कृत भाषेत आहे. संस्कृत भाषेमुळे उच्चार स्पष्ट होतात. सर्व भारतीय भाषांचा उगम संस्कृत भाषेपासूनच झालेला असल्याने सर्व भारतीय भाषांमध्ये ४० ते ६० टक्के शब्द हे संस्कृत अथवा संस्कृतोद्भव आहेत.

आजच्या जागतिकीकरणाच्या रेट्यामध्ये भारतीय भाषांचे मुळ टिकवून ठेवण्यासाठी आणि भारतीय भाषांच्या नियमित विकासासाठी नवीन शब्द निर्मितीचे सामर्थ्य संस्कृत भाषेत असल्याने संस्कृतचा उपयोग कायम होवू शकतो. संस्कृत भाषेत स्वर व व्यंजनाची आवश्यक तेवढी संख्या असल्याने सर्व उच्चारांचे योग्य प्रकारे लिखाण होऊ शकते. तसेच लेखन व उच्चारांमध्ये समानता असते म्हणूनच उच्चाराप्रमाणे ऐकून लिहिणारा संगणक निर्मितीसाठी संस्कृतभाषा शास्त्रीयदृष्ट्या उपयुक्त ठरते. त्यामुळेच आजच्या वैज्ञानिक, संगणक युगातही संस्कृतचे स्थान अबाधीत आहे. केंद्रातील भाजपाप्रणीत सरकारने सर्व शाळांमधून संस्कृतभाषा शिकविणे संदर्भात काढलेला अध्यादेश प्रशसंनीय निर्णय आहे.

संस्कृत भाषेतील ग्रंथांमध्ये विषयांतील सखोल ज्ञान उपलब्ध आहे. मात्र संस्कृत भाषेचा अभ्यास होत नसल्याने आपण ज्ञानापासून वंचित राहतो. संस्कृत ही ग्रंथभाषा व शिक्षणाची माध्यमभाषा भिन्न असल्याने आपण अपेक्षित अर्थापर्यंत पोचत नाही–ज्ञानाची गंगोत्री असलेल्या संस्कृत भाषेचे अध्ययन सर्व क्षेत्रातील व्यक्तींनी करणे अत्यावश्यक आहे. या सर्व गाष्टींचा विचार करूनच समता इंटरनॅशनल स्कूलमध्ये संस्कृत विषय शिकविण्यास महत्त्वाचे स्थान दिले आहे. सांगताना मला अभिमान वाढतो की, व्यापक, उदात्त विचारांचे संस्थाचालक व पदाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली विकासाच्या वाटेवरून मार्गक्रमण करीत असलेल्या मोठ्या शैक्षणिक संस्थेत मी संस्कृत शिक्षक म्हणून कार्यरत असल्याचा मला अभिमान आहे.

**श्री.महेश भाऊसाहेब उफाडे,**
संस्कृत शिक्षक समता इंटरनॅशनल स्कूल, कोकमठाण

पान १ वरून

गोकूळ महाजन यांनी करून दिला तसेच २०१३–१४ चा वर्षत्तचे अहवाल वाचन करून शाळेच्या प्रगतीचा आढावा सादर केला.

त्यानंतर विविध स्पर्धेतील विजेत्यांना यावेळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. जिल्हास्तरीय मैदानी क्रिडा स्पर्धेत तन्वी बावळेला २ सुवर्णपदके, लांबउडीत रौप्यपदक, सचिन छाजेडला ५० व ३० मीटर रनिंग स्पर्धेतील सुवर्णपदक, लांब उडीचे रजत पदक, स्वराज खिराडकरला रजतपदक व रोशनी ससाणेला लांब उडीचे सुवर्णपदक देण्यात आले. पुणे येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय महापौर चषक स्पर्धेतही रचित छाजेडने सुवर्ण तर स्वराज खिराडकरने कास्य पदक प्राप्त केले. त्यांनाही यावेळी गौरविण्यात आले. राष्ट्रीय पातळीवरील चिंतन स्पर्धेतील विजेती अन्वी उंबरकर, राज्यपातळीवरील स्पर्धेत विजेती आदीती बारहाते व जिल्हापातळीवरील विजेते श्लोक अग्रवाल, आदीती भोसले व देशना अजमेरा यांनाही यावेळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिके देवून गौरविण्यात आले. शालेय स्तरीय कथाकथन स्पर्धेतील विजेते प्रथमेश भट्टड, राघव वाघ, स्वरा गवारे, अन्वी उंबरकर व हर्षिता अजमेरे तसेच राजवर्धन काळे, शांभवी देशमुख व अन्वी दुबे यांनाही यावेळी मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके व प्रमाणपत्रे देण्यात आली.

त्यानंतर रंगारंग सोहळा सुरु झाला. **वसुधैव कुटूंबकम्** या संकल्पनेवर आधारीत या सोहळ्यास प्रारंभ झाला. भगवान श्रीकृष्णाच्या सुसज्ज रथातील आगमनाने यदा यदा ही धर्मस्य ग्लानीर्भवतु भारत या श्लोकाद्वारा श्रीकृष्णाच्या वाणीतून या संपूर्ण कार्यक्रमाचे संकल्पना उलगडण्यात येत होती. व त्या अनुषंगाने कार्यक्रम सादर होत होते. ज्ञानेश्वर माऊलीच्या पसायदानाने सांस्कृतिक कार्यक्रमाची सरुवात झाली. त्यानंतर पर्यावरण रक्षणाचा संदेश विविध पक्षी प्राण्यांच्या वेशभूषेतील चिमूकल्यांनी दिला. त्यावेळी देशाचे सुसज्ज सैनिक दल, शिवछत्रपती राज्याभिषेकसोहळा, सावित्रीबाई फुले, झाशीची राणी, साई पालखी, संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान, क्रांतीकारी भगतसिंग, राजगुरु, सुखदेव फाशी, अंतराळयान आदी चित्ररथही साकारण्यात आले होते. उपस्थितांनी संपूर्ण कार्यक्रमाची भरभरून दाद दिली.

चित्तथरारक स्केटींग डान्स, फायर डान्स तसेच हवेतील चित्तथरारक साहसदृष्ये कुलदीप कोयटे या विद्यार्थ्याने सादर करून प्रेक्षकांना थरारक अनुभव दिला.

याप्रसंगी प्री प्रायमरी व प्रायमरी सेक्शन कोपरगांव शहरात सुरु करण्यासाठी संस्थेला असलेली जागेची समस्या जाणून घेवून गोकुळनगरी भागातील कै.सुरेशशेठ कोठारी यांचे कुटुंबियांनी आपला राहता बंगला प्री प्रायमरी व प्रायमरी सेक्शन सुरु करण्यासाठी उपलब्ध करून दिल्याबद्दल काका साहेबांनी त्यांचे मन:पूर्वक जाहीर आभार मानले. यावेळी श्रीमती चंदाभाभी कोठारी यांचा संस्थेच्या मॅनेजिंग ट्रस्टी सौ.स्वाती कोयटे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कोकमठाणसारख्या ग्रामीण भागात सुसज्ज, अत्याधुनिक शाळा सुरु केल्याबद्दल कोकमठाणच्या ग्रामसंस्थांच्या वतीने श्री सुभाषजी लोंढे यांनी स्कूलचे संस्थापक श्री काकासाहेब कोयटे यांचा शाल व पुष्पगुच्छ देवून सत्कार केला.

या संपूर्ण सोहळ्याचे सुत्र संचालन अन्वी उंबरकर, प्रथमेश भट्टड, अन्वेशा वर्षे, दिशा आव्हाड, अपूर्वा बागुल व यश बोरा या विद्यार्थ्यांनी अतिशय प्रभावीपणे केले. तर आभार प्रदर्शन उपप्राचार्य सौ.लिसा बर्धन यांनी केले.

विद्यार्थ्यांनी पेटत्या मशाली हाती घेवून तसेच सर्व उपस्थितांशी मेणबत्त्या पेटवून शांततेचा संदेश देत यावैशिष्टपूर्ण सोहळ्याची सांगता करण्यात आली.



# वाढदिवसानिमित्त हार्दिक अभिष्टचिंतन सर्वांना सुख लाभावे तशीच आरोग्यसंपदा


सार्थक अनिल देशमुख
३ फेब्रुवारी


उर्वी यशोधन पितांबरे
३ फेब्रुवारी


सार्थक योगेश गंगवाल
३ फेब्रुवारी


यश अभिजीत धोर्डे
४ फेब्रुवारी


अक्षरा विशाल बडजाते
५ फेब्रुवारी


जयरूप प्रदीप साखरे
७ फेब्रुवारी


आदिती नितीन बोरनारे
९ फेब्रुवारी



हृदया तुषार बागरेचा
९ फेब्रुवारी


स्वरा स्वप्नील गवारे
११ फेब्रुवारी



दिव्या राहूल सांड
११ फेब्रुवारी


आकांक्षा प्रशांत आसने
११ फेब्रुवारी


रिया अभयकुमार बोथरा
१२ फेब्रुवारी


देशना सुशील अजमेरा
१६ फेब्रुवारी


निहिरा संदीप रहातेकर
१९ फेब्रुवारी


मीत शेखर अजमेरा
२१ फेब्रुवारी


रोशनी योगेश ससाणे
२१ फेब्रुवारी


हर्ष खुशाल ठाकूर
२१ फेब्रुवारी


विश्वजीत कैलास रोहम
२२ फेब्रुवारी


जय संदीप वर्पे
२२ फेब्रुवारी


ओम संतोष भुसारे
२४ फेब्रुवारी


राजवीर आनंद जगताप
२५ फेब्रुवारी


प्रिया अमोल भुसारे
२६ फेब्रुवारी


नंदिनी शैलेश बाफना
२९ फेब्रुवारी


निकिषा योगेश ओस्तवाल
२९ फेब्रुवारी

**शुभेच्छुक : समता परिवार,कोपरगांव**

# लक्षवेध

## लक्षवेध

समाजात नेते राजकारणी आणि तत्सम अन्य मंडळी नसतील तर काय फरक पडणार आहे? ही मंडळी कोणते सेवेचं वा उत्पादक काम करतात की ज्यामुळे सर्वसामान्यांच्या आयुष्यात काही अडतं मात्र गटार साफ करणारे, रस्ते झाडणारे, कचरा भरून-वाहून नेणारे, शाळा-कार्यालये व इतर संस्थांमधील सफाई कर्मचारी, माळी काम करणारे, धुणी-भांडी करणाऱ्या मोलकरणी, पाळणाघर चालविणाऱ्या स्त्रिया, घरी लहान बालकांना सांभाळणारी दायी, बसचालक, रिक्षाचालक, फेरीवाला, शेतकरी, शेतमजूर, तलाव बांधणारे, औषध देणारे, भाजी-फूल विक्रेते, खुर्च्या-टेबल बनविणारे, बांधकाम व्यवसायातील मजूर, बसचालक, वाहक, ज्ञानदान करणारे शिक्षक, जन्मापासून मृत्यूपर्यंत प्रत्येक क्षणाला हे सहकार्य करणारे लोक नसतील तर काय होईल? विचार केलाय कधी? आपल्या आजु बाजूला कार्यरत ही मंडळी अत्यंत महत्त्वाची आहेत ही मंडळी नसतील तर जगणं अवघड होईल. उपयोगी व महत्त्वाची काम करणाऱ्यांची यादी बनवा. लक्षात येईल की, आपण महत्त्वाची कामं करणाऱ्यांना कमी महत्त्व देतो आणि काही लोकांना उगाचच खूप महत्त्व देतो त्यामुळे सफाई कर्मचारी खालच्या तळाला जातो.

लक्षात ठेवा वीजेचा दिवा बनविणारा हा अणुबॉम्ब बनविणाऱ्यापेक्षा मोठा आहे, महत्त्वाचा आहे. मोठमोठे शोध लावणाऱ्या शास्त्रज्ञापेक्षा अन्नधान्याचे उत्पादन करणारा शेतकरी मोठा आहे. कारण अन्न हे सर्व प्राणीमात्रांना जीवीतासाठी अत्यावश्यक आहे. जीवदान देणाऱ्या डॉक्टरांइतकाच महत्त्वाचा वाटा आहे. स्मशानभूमीत अंत्यविधीसाठी सर्वतोपरी मदत करणारा कर्मचारी तो पाहत नाही की, अंत्यविधीसाठी आलेला मृतदेह गरीबाचा आहे की धनवानाचा तो त्याच काम सर्वांसाठी एकाच भूमिकेतून करीत असतो. कुणाला उगाचच डोक्यावर घेवू नका वा कुणाला क्षुल्लक बाबीसाठी नाउमेद करू नका ज्याच्या त्याच्या कामाचं श्रेय ज्याचं त्याला द्या. किमान खालच्या दर्जाचे काम करणारे म्हणूनअशा लोकांना हीन लेखू नका. माणसाला माणसासारखं वागवा.

पान १ वरून

ध्वजारोहण सोहळ्यास समता इंटरनॅशनल स्कूलचे संस्थापक अध्यक्ष श्री. ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे, संचालक सर्वश्री जितेंद्रभाई शहा, मोहनशेठ झंवर, गुलाबचंदजी अग्रवाल, रामचंद्रजी वागरेचा, अरविंदजी पटेल, चांगदेवजी शिरोडे, रमेशअप्पा साखरे, नंदीकेश्वर हुंडेकरी, संदिप कोयटे, निरव रावलिया, सौ.शोभाताई दरक, श्री कचरू मोकळ, सौ.सुहासिनीताई कोयटे, सौ.श्वेता अजमेरा, समता स्कूलच्या व्यवस्थापकीय विश्वस्त सौ.स्वाती संदिप कोयटे, सौ. सिमरन खुबानी, समता पतसंस्थेचे जनरल मॅनेजर श्री.सचिन भट्टड, प्राचार्य गोकुळ महाजन, उपप्राचार्या सौ.लिसा बर्धन आदि मान्यवर या प्रसंगी उपस्थित होते.

आदित्य उंबरकर या विद्यार्थ्याने प्रजासत्ताक दिना निमित्त माहिती सांगितली. त्यानंतर शालेय स्तरावरील विविध उपक्रमांमध्ये सहभागी शिक्षक व विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रशस्ती पत्रक व स्मृति चिन्हे देऊन गौरविण्यात आले. या सोहळ्यात विद्यार्थ्यांनी रंग दे बसंती या गितावर मनोवेधक नृत्याविष्कार सादर केला.

या प्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना श्री चेतनजी भुतडा यांनी प्रतिपादन केले की स्वातंत्र्य प्राप्ती नंतर २६ नोव्हेंबर १९४९ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पहिले राष्ट्रपती डॉ.राजेंद्र प्रसाद यांचेकडे भारतीय घटना सुपूर्द केली व २६ जानेवारी १९५० रोजी तिची अंमलबजावणी झाली व भारत प्रजासत्ताक देश बनला म्हणून २६ जानेवारी हा दिन प्रजासत्ताक दिन म्हणून साजरा केला जातो. ते पुढे म्हणाले की, केवळ सैन्यदलातच भरती होऊन देश सेवा घडत नाही किंवा देशप्रेम दिसत नाही. दैनंदिन जीवनातही देशसेवा करण्यायोग्य अनेक गोष्टी आहेत, जसे की, विद्यार्थ्यांनी शाळा, बस, ट्रेन, व अन्य सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता पाळणे, ज्येष्ठ व वरिष्ठांचा सन्मान राखणे प्रामाणिकपणे नियमित अभ्यास करून गुणवत्ता प्राप्त करणे, स्वयंस्फूर्तीने सामाजिक उपक्रमात सहभाग घेणे, स्वयंस्फूर्तीने अभ्यास करून आपले लक्ष्य गाठणे या सर्वातूनही आपण देशाचे सुदृढ सक्षम व गुणवत्ताधारक भावी नागरीक बनू शकतो ही देशसेवाच आहे. आगामी काळात भारत सुपरपॉवर बनावा यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याची गरज आहे. तिरंगी ध्वजाचा अर्थ समजावतांना ते म्हणाले की, ध्वजातील केशरी रंग शौर्याचे, पांढरा रंग शांतीचे तर हिरवा रंग उत्पादकता व समृद्धीचे आणि जांभळ्या रंगातील २४ आऱ्या असलेले अशोकचक्र धर्माचे प्रतिक आहे.

या सोहळ्याचे सुत्र संचालन सौ.स्वाती बेनके यांनी केले. सौ.सरीन व सौ. शाद्मीन यांचे सुत्र संचालनात सहकार्य लाभले. उपप्राचार्या सौ.लिसा बर्धन यांनी आभार प्रदर्शन केल्यानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

या सोहळ्यास विविध मान्यवरांसह समता पतसंस्थेच्या सर्व शाखांचे अधिकारी, पदाधिकारी, कर्मचारी तसेच समता स्कूलचा शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संधीचे सोने करावे

शिक्षणमंत्री नियुक्तीपासूनच स्मृती इराणी वादात अडकली
तुमची यत्ता कंची कॉंग्रेसवाल्यांनी विचारणा केली
स्मृतींकडे पदवी नसल्याचा कॉंग्रेसने केला दावा
येल विद्यापीठाची पदवीधर असल्याचा स्मृतींनी दिला पुरावा
एक दिवस तुम्ही राष्ट्रपती व्हाल ज्योतिषी व्यास वदले
विरोधकांना मात्र पुन्हा हाती आयतेच कोलीत मिळाले
मोदींनी दिलेल्या संधीचे रूपांतर स्मृतींनी करावे सोन्यात
नाहीतर लौकरच त्यांना तलवार घालावी लागेल म्यानात
अशी संधी पुन्हा पुन्हा चालून येत नाही ती भाग्याने मिळते
प्रसार माध्यमांना सांगणार कोण? त्यांना अंधश्रद्धा दिसते.

# समता इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांचे चिंतना परिक्षेमध्ये यश

कोपरगांव : चिंतना प्रकाशन व नवोदया प्रकाशन चित्रदुर्ग, कर्नाटक यांचे तर्फे घेण्यात आलेल्या चिंतना इंग्लीश ग्रामर परिक्षेमध्ये समता इंटरनॅशनल स्कूलच्या प्रि प्रायमरी विभागातील विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. संपूर्ण देश पातळी, राज्य पातळी व जिल्हा पातळीवर झालेल्या या परिक्षेमध्ये समता इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी प्रशस्तीपत्रक व पदक प्राप्त केले.

या परिक्षेमध्ये एल.के.जी. व यु.के.जी. मधील ५३ विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला. या पैकी यु.के.जी. मधील अन्वी संजय उंबरकर हिने नॅशनल लेव्हल सुवर्णपदक प्राप्त केले तर आदिती प्रशांत बारहाते हिने राज्य स्तरावरील सुवर्ण पदक प्राप्त केले तसेच श्लोक आशिष अग्रवाल याने जिल्हा पातळीवरील सुवर्ण पातळीवरील सुवर्णपदक प्राप्त केले. तर एल.के.जी. मधील अव्दैता गोविंद भोसले व देश्ना सुशील अजमेरे यांनी जिल्हा पातळीवरील सुवर्ण पदक प्राप्त केले. कोपरगांव पोलीस स्टेशनचे पोलीस इन्स्पेक्टर श्री.साजनजी यांच्या हस्ते सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार, समता इंटरनॅशनल स्कूलच्या वार्षिक स्नेहसंमेलनात करण्यात आला.

प्रि प्रायमरी विभाग प्रमुख सौ.स्वाती वेनके व सौ.चैताली पटारे यांनी मुलांकडून अतिशय उत्तम पद्धतीने तयार करून घेतली होती. समता इंटरनॅशनल स्कूलच्या वरील विद्यार्थ्यांचे अभिनंदन समता इंटरनॅशनल स्कूलच्या व्यवस्थापकीय विश्वस्त सौ.स्वाती संदिप कोयटे, प्राचार्य श्री गोकुळ महाजन, उपप्राचार्या सौ.लिसा बर्धन तसेच सर्व शिक्षकवृंदाने केले.


अदिती बारहाते


अव्दैता भोसले


अन्वी उंबरकर


देश्ना अजमेरे


श्लोक अग्रवाल

# स्व.दादाप्पा खंडाप्पा कोयटे विद्यालयात ६६वा प्रजासत्ताक दिन सोहळा उत्साहात संपन्न

कोपरगांव : येथील निवारा वसाहतीतील स्व.दादाप्पा खंडाप्पा कोयटे विद्यालयात ६६ वा प्रजासत्ताक दिन सोहळा उत्साहवर्धक वातावरणात संपन्न झाला. सोहळ्यासाठी उपस्थितांचे श्रीमती प्रेरणा मगर यांनी स्वागत केले. श्री नंदीकेश्वर हुंडेकरी व प्रसिद्ध समाजसेविका सौ.नंदाताई हुंडेकरी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी उपस्थित सर्वांनी राष्ट्रगीत म्हणत तिरंग्याला मानवंदना दिली. ध्वज वंदनानंतर शाळेच्या बालचमुने ध्वजगीत व देशभक्तीपर गीत तालासुरात सादर केले. विद्यालयात वैभवी आहिरे, मयुरी पारखे, पुष्कर आहिरे, विनित देवरे, अजिंक्य काजळे यांनी प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व विशद केले.

उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आला. तसेच समता पतसंस्थेतर्फे इ. १ ली ते ४ थी च्या विद्यार्थ्यांना सन्माननीय मान्यवरांच्या हस्ते गणवेश वाटप करण्यात आले.

ध्वजारोहण सोहळ्यास विद्यालयाच्या शालेय, शिक्षण समितीच्या अध्यक्षा सौ.सुहासिनीताई कोयटे समता पतसंस्थेचे चेअरमन श्री.काकासाहेब कोयटे, सौ.स्वाती कोयटे, श्री. कोते. सर श्री.काटे गुरुजी, श्री.देव सर, श्री म्हस्के सर, श्री.खानापुरे सर, समता पतसंस्थेचे पदाधिकारी व कर्मचारी, निवारा वसाहतीतील शिक्षणप्रेमी नागरीक व पालक, सोहळ्यास बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री.निकुंभ सर यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी विद्यालयातील सर्व शिक्षकवृंद व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.


स्व.दादाप्पा खंडाप्पा कोयटे विद्यालयात प्रजासत्ताकदिनी ध्वजारोहण करताना श्री. नंदीकेश्वर व सौ. नंदाताई हुंडेकरी सोबत श्री. निकुंभ सर, मान्यवर व विद्यार्थी

# चित्रपट अभिनेत्री किशोरी शहाणे यांची समताच्या शिर्डी शाखेस सदिच्छा भेट

कोपरगांव : सुप्रसिद्ध मराठी व हिंदी चित्रपट अभिनेत्री किशोरी शहाणे विज व त्यांचे पती सुप्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक दिपक बलराज साहनी बिज यांनी १६ जानेवारी रोजी प्रदर्शित क्लासमेंट चित्रपटास सुयश लाभावे यासाठी श्री.साईबाबांचे दर्शनास आले होते. त्यावेळी समता पतसंस्थेच्या शिर्डी शाखेचे कर्मचारी श्री.प्रदीप वैद्य यांच्या विनंतीनुसार किशोरी शहाणे व त्यांचे पती बलराज यांचे समवेत शिरडी येथील समता पतसंस्थेच्या शाखेस सदिच्छा भेट दिली. यावेळी शाखाधिकारी श्री संतोष बैरागी यांनी त्यांचा शाल व पुष्पगुच्छ देवून सत्कार केला. तसेच समता पतसंस्थेच्या आर्थिक प्रगतीविषयी व सामाजिक कार्यासंबंधी माहिती दिली. समता संस्थेत सध्या वापरत असलेले व भविष्यात वापरण्यात येणाऱ्या अद्ययावत तंत्रज्ञानाविषयी माहिती दिली.


समताच्या शिर्डी शाखेस सदिच्छा भेटीस आलेले अभिनेत्री किशोरी शहाणे त्यांचे पति चित्रपट दिग्दर्शक बलराज विज सहानी सोबत समताचे प्रदिप वैद्य, अनिल उदावंत, शशी सोनवणे, सिमंतीनी कुलकर्णी इत्यादी

या प्रसंगी शाखेतील कर्मचारी श्री. वैद्य, श्रीमती कुलकर्णी, बागडे, सोनवणे, आहेर व अंतर्गत लेखापरिक्षक श्री.अनिल उदावंत उपस्थित होते.

किशोरी शहाणे यांनी संस्थेच्या आर्थिक प्रगतीविषयी समाधान व्यक्त करुन संस्थेची भावी वाटचालीस मनःपुर्वक शुभेच्छा दिल्या.

समताच्या शिर्डी शाखेत भेटीस आलेले अभिनेत्री किशोरी शहाणे व त्यांचे पती चित्रपट दिग्दर्शक दिपक बलराज साहनी बिज सोबत समता शाखेचे प्रदीप वैद्य, अनिल उदावंत, शशी सोनवणे, सिमंतीनी कुलकर्णी आदी कर्मचारी दिसत आहे.

## संस्थेची आर्थिक स्थिती– दि. ३१ डिसेंबर २०१४ अखेर

| | |
|---|---|
| स्वनिधी | १८ कोटी ४ लाख ११ हजार |
| राखीव निधी व इतर निधी | २४ कोटी ५५ लाख १५ हजार |
| ठेवी | २५७ कोटी |
| कर्ज वाटप | १८७ कोटी ७४ लाख १६ हजार |
| गुंतवणूक | ७९ कोटी ८७ लाख ८६ हजार |
| कायम मालमत्ता | ८ कोटी ४५ लाख ६३ हजार |
| निव्वळ एन.पी.ए. | ०% |

## ठेवींचे आकर्षक व्याजदर

ठेवी ठेवा समतात आणि रहा बिनधास्त

| | |
|---|---|
| ४६ दिवस ते ९० दिवस | – ८% |
| ९१ दिवस ते १८० दिवस | – ९% |
| १८१ दिवस ते ३६४ दिवस | – १०% |
| १२ महिने (चक्रवाढ व्याज) | – १३% |

रिकरिंग ठेव – १२ महिने ते २४ महिने – १०%

'समता वार्ता' हे पत्र प्रकाशक ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे ''समता चॅरीटेबल ट्रस्ट'' कोपरगाव यांचेसाठी मुद्रक किरण चंद्रकांत माळी यांनी शिवम् ग्राफिक, निवारा कॉर्नर, कोपरगाव जि अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून समता पतसंस्था कोपरगाव ता. कोपरगाव जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले संपादक ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे मो. ९८२२४३५२५५/९३७१३३३५५५, सहसंपादक: बेबी मनोहर मराठे, ऑफिस फोन ०२४२३ २२५५५७/८
ई–मेल : samtavarta@gmail.com (या अंकामध्ये छापलेल्या मजकुरांशी संपादक/प्रकाशक सहमत असतिलच असे नाही. वादविवाद कोपरगाव न्यायकक्षेत) RNI NO. MAHMAR43417 /13-TC